
# एज्राः देवाच्या लोकांचे नवीकरण

## पवित्र आत्म्याच्या द्वारे उपासकांचे नवीकरण व वैयक्तिक

परिवर्तन मुलांना शिकवणाऱ्यानी R2b हा अभ्यासक्रम वाचावा




### 1. एज्राने केले त्याप्रमाणे, तुमचे अंतःकरण व मन देवाच्या वचनाने सज्ज करा

देवाच्या पवित्र आत्म्याच्या द्वारे विश्वासणाऱ्यांना दररोजच्या नव्या जीवनात मार्गदर्शन करता यावे यासाठी त्याच्याकडे सहाय्य मागा.

- पवित्र आत्म्याचे जीवन बदलून टाकणारे सामर्थ्य तुमच्या जीवनात व विश्वासणाऱ्यांच्या जीवनात यावे याकरीता प्रार्थना करा.

सर्व समर्थ देव करीत असलेल्या नवीकरणाला अडथळा आणाऱ्या गोष्टी तो तुम्हांला दाखवो. त्या गोष्टी कबूल करा.

याजक एज्रा व त्याच्या सहकाऱ्यांनी, ख्रिस्ताचा जन्म होण्यापूर्वी सुमारे 400 वर्षे अगोदर, इस्राएली लोकांना त्यांच्या पहिल्या, दीर्घकाळ टिकाणाऱ्या, राष्ट्रीय नवीकरणाकडे नेले. देवाचे लोक अघाप जुन्या कराराच्या कडक शिस्तीच्या नियमशास्त्राच्या बंधनात राहात होते. मूर्तीपूजक लोकांशी विवाह करणे हे त्यांच्या अनेक पातकांपैकी एक पातक होत.

एज्रा व लोकांनी काय केले ते पाहा वाचा **एज्रा 9:1-10:6**

- एज्रा 9:3-4 ह्या वचनांत पाहा त्या पातकांसाठी एज्राला झालेले दुःख त्याने कसे व्यक्त केले.
- एज्रा 9:5-7 व 13-15 ह्या वचनांत पाहा एज्राने पाप कबूलीसाठी केलेली प्रार्थना किती गंभीर होती.
- एज्रा 10:1 ह्या वचनात लोकांनी त्यांचे दुःख कसे व्यक्त केले ते पाहा.
- एज्रा 10:2-3 ह्या वचनांत शखन्याने लोकांना काय करण्याचा सल्ला दिला.

हा वृत्तांत **नहेम्या 8:1-9:3** ह्या वचनांत पुढे सुरू आहे.

अनेक गावांतून देवाचे लोक उपासना करण्यासाठी एकत्र जमावे.

- नहेम्या 8:1-3 ह्या वचनांत लोकांनी देवाच्या वचनाचा सन्मान कसा केला ते पाहा.
- नहेम्या 8:5-6 ह्या वचनांत उपासना करणाऱ्यांनी आपल्या शरीराच्या तीन हालचाली कशा केल्या ते पाहा.

- एज्राने एकटयाने शिकवले नाही नहेम्या 8:7-8 ह्या वचनांमध्ये इतर शिक्षकांनीही काय केले ते पाहा.
- नहेम्या 8:9 ह्या वचनात लोकांनी ऐकून काय केले ते पाहा.
- नहेम्या 9:1-3 ह्या वचनांत लोकांनी कशाची कबूली दिली ते पाहा.

**नवा करारही** आम्हांला नवीकरणाविषयी सांगतो.

- योहान 3:1-6 ह्या वचनांत नव्या जन्मालाआमच्या जीवनांत कशी सुरूवात होते पाहा.
- 2 करिंथ 5:17 ह्या वचनात देव प्रत्येक विश्वासणाऱ्याच्या जीवनात कोणत्या गोष्टी नव्या करतो पाहा.
- 1 योहान 1:8-10 ह्या वचनांत देवासमोर स्वच्छ शुद्ध असे उभे राहण्यासाठी आम्ही पातकाच्या बाबतीत काय केले पाहिजे, ते पाहा
- 1 पेत्र 2:1-3 ह्या वचनांत आम्ही दोन गोष्टी करणे अगत्याचे आहे, ते पाहा
- रोम 12:1-2 ह्या वचनांत आम्ही दोन गोष्टी करणे अगत्याचे आहे, ते पाहा.

पाठ करा स्तोत्र 51:9-10 ह्या वचनांतील दावीदाची पाप कबूलीची प्रार्थना.

**2. सहकाऱ्यांशी चर्चा करून तुम्ही आणि वि श्वासणारे आठवडयात काय करणार त्याची योजना आखा.**

- इस्राएली लोकांनी केले त्याप्रमाणे तुमच्या भागातील इतर मंडळ्यांशी संपर्क साधून उपासनेची सभा आयोजित करा. सर्वजण एकत्र येऊन उपासना करणे. पातकांची कबूली देणे आणि देवाचे आनंददायी नवीकरण मिळवणे यासाठी योजना करा.
- ज्या विश्वासणाऱ्यांचा विश्वास थंडावला आहे अशांची जाऊन भेट घ्या आणि त्यांचे येशूमध्ये पवित्र आत्म्याच्या द्वारे नवीकरण होण्यासाठी त्यांना सहाय्य करा.



येशूला स्वीकारल्या वरही मी पुष्कळ पातके केली आहेत! देव माझे नवीकरण करणारच नाही!

या रडणाऱ्या बाईंना तुम्ही काय सांगाल?

**3. सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या उपासनेची योजना आखा.**

**एज्राचा वृत्तांत वाचण्यासाठी कोणाची तरी तयारी करून घ्या.**

तो किंवा ती हा वृत्तांत लक्षात ठेवून कथन करील किंवा साभिनय तो सादर करील.

भाग 1 मध्ये तुम्हांला एज्रा अध्याय 8 व 9 विषयी काय समजले त्या बाबतीत प्रश्न विचारा.

प्रत्येकाला प्रार्थना करण्यास आणि त्यांची पातके कबूल करण्यास बोलवा. त्यांना त्यांची व्यक्तीगत पातके, जसे लैंगिक अनैतिकता, शांतपणे देवाजवळ कबूल करण्यास सांगा.

नवा जन्म होण्यासाठी त्यांनी काय केले पाहिजे ते सांगा. एज्राने त्याच्या लोकांना एक गट म्हणून जे करण्यास सांगितले तेच देवाच्या लोकांनी केले पाहिजे:

- देवाचे वचन काळजीपूर्वक ऐका आणि त्याचे आज्ञापालन करा.
- आपली पातके देवाजवळ कबूल करा आणि पवित्र आत्म्याच्या सहाय्याने त्यापासून मागे फिरा.
- एकमेकांबरोबर आणि देवाबरोबर गांभीर्याने करार करा, ख्रिस्ताकडून दररोज नवीकरण मिळणे यासाठी अशा गोष्टी रोजच्या रोज कबूल करण्याची नेहमी सवय लावून घ्या.

विश्वासणाक्रयांचे देवाने नवीकरण करावे यासाठी त्यांना देवाशी गंभीरतापूर्वक करार करण्यास सांगा.

- करार म्हणजे काय चर्चा करा प्रत्येकजण करतो असा गंभीरतापूर्वक केलेला करार होय.
- लोकांनी व एज्राने जे केले ते करण्यास एकमेकांशी व देवाशी सहमत होण्यास विश्वासणाक्रयांना सांगा.
- तुमची पातके दररोज कबूल करणे आणि पवित्र आत्म्याला आमच्या अंत: करणांत करू देण्यास परवानगी देणे या गोष्टींशी सहमत व्हा.
- प्रत्येकाकडून 2 करिंथ 4:16 हे वचन तोंडपाठ करून घ्या. ''म्हणून आम्ही धैर्य सोडीत नाही, परंतु जरी आमचा बाहय देह क्षय पावत आहे, तरी अंतरात्मा दिवसानुदिवस नवा होत आहे.''

योशीया राजाने प्राचीन इस्राएलमध्ये कशा प्रकारे नवीकरण आणले त्याचा वृत्तांत सांगण्यासाठी किंवा नाट्यीकरण करण्यासाठी मुलांच्या शिक्षकाची भेट घेऊन योजना आखा.

प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी एज्रा 6:19-21 ह्या वचनांत काय घडले ते थोडक्यात सांगा. स्पष्ट करा:

- त्यांनी वल्हांडणाचा पशू खाऊन साजरे केले. आज, ख्रिस्त आमचा वल्हांडणाचा कोकरा आहे.
- प्रथम याजक विधीवत स्नान करीत असे. आज, आम्ही आमची पातके कबूल केली म्हणजे शुद्ध होतो.

  लोकांनी, त्यांना वल्हांडणाचे भोजन योग्य प्रकारे करता यावे यासाठी त्यांच्या मूर्तिपूजक शेजाऱ्यांच्या दुष्ट सवयींपासून स्वत: ला दूर ठेवले आज, आम्ही एकमेकांबद्दल प्रीती दाखवून योग्य प्रकारे प्रभूच्या मेजापाशी येऊन त्यातून सेवन करतो.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net